**विभागीय आयुक्त कार्यालय, कोंकण विभाग, विकास शाखा, नवी मुंबई.**
**सनदी लेखापाल नियुक्ती बाबत जाहिरात.**

कोंकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या सन २०१६-१७, २०१७-१८ व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासाठी प्रत्येक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणासाठी आठ सनदी लेखापालांचे पॅनल तयार करण्यासाठी पॅनल मध्ये समाविष्ठ होण्यास इच्छूक सनदी लेखापाल यांज कडुन दि. २१/११/२०१६ रोजी दु. १५.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

प्रत्येक आर्थिक वर्षाचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सर्व योजनांच्या लेखा परिक्षणाचे शुल्क खालील प्रमाणे राहील.

अ) रु. ५० कोटी पर्यंत खर्च असणा-या कार्यालयांसाठी रु. ५०,०००/-

आ) रु.५०,००,००,००१ ते ७५,००,००,०००/- खर्च असणा-या कार्यालयांसाठी रु. ६०,०००/-

इ) रु. ७५,००,००,०००/- पेक्षा जास्त खर्च असणा-या कार्यालयासाठी रु. ७०,०००/-

**या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणामध्ये गटपातळीवरील लेख्याच्या परिक्षणाचा समावेश राहील.

प्रत्येक योजना निहाय स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल ६ प्रतीत प्रतिवर्षी ३१ ऑगस्ट पूर्वी संबंधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस सादर करणे बंधनकारक राहील. मुदतीत लेखापरीक्षण अहवाल सादर न करणा-या सनदी लेखापालाच्या शुल्कातुन १०% इतकी कपात करण्यात येईल.

पॅनलवर निवड झालेच्या सनदी लेखापालींनी संबंधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी नियुक्तीच्या अटी व शर्ती मान्य असले बाबत करारनामा लिहुन द्यावा लागेल. **पॅनलसाठी नेमणुकीच्या अटी व शर्ती चे अधिक तपशील जाणुन घेण्यासाठी या कार्यालयाकडे अथवा संबंधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी संपर्क साधावा तसेच सदर विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी मागणी करुन मिळू शकेल.**

इच्छूकांनी आपले अर्ज कोंकण विभागातील एखदया विशिष्ट जिल्हयातील अथवा एका पेक्षा अधिक जिल्हयासाठी एकाच अर्जात जिल्हयाची नावे नमुद करुन दिले तरी चालेल. अर्जात लेखापरीक्षणाचा अनुभव (स्थानिक किंवा जिल्हयाबाहेरील), सनदी लेखापालाकडील कर्मचारी संख्या, विनाअट लेखी संमती याबद्दलची माहिती स्पष्टपणे नमुद करण्यात यावी. अर्जासोबत सनदी लेखापाल म्हणून प्रमाणपत्राची प्रमाणीत सत्यप्रत जोडण्यात यावी व अर्ज विहित नमून्यात करण्यांत यावा.

अर्ज विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, विकास शाखा, कोंकण भवन, पहिला मजला रु. नं. ११०, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ या पत्त्यावर पाठवावा.

**सही/-**
**(प्रभाकर देशमुख)**
**विभागीय आयुक्त, कोंकण विभाग.**